स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय महाराष्ट्र राज्य,**

**कोकण भवन, सहावा मजला नवी मुंबई ४०० ६१४.**

☎/ 🖷:-- ०२२-२७५७१३९१ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in

क्र.स्था-१८/ब/संकीर्ण/न.क्रं.३७५/आस्था-२/ ८८८ दिनांक:- 15 MAR 2022

प्रति,

मा.प्रधान सचिव,
(लेखा व कोषागारे),
वित्त विभाग, मंत्रालय,
मुंबई.

**विषय-** सहाय्यक लेखा अधिकारी/लेखा अधिकारी संवर्गातील पदस्थापना/ पदोन्नती करताना स्थानिक निधी लेखा विभागातील अनुभवाचा प्राधान्याने विचार करणेबाबत.

**संदर्भ:-१)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक, दिल्ली यांचे दि.३१.०१.२०२२ चे पत्र
**२)** प्रधान महालेखाकार, मुंबई यांचे दिनांक २२.०२.२०२२ चे बैठकीतील संदर्भ.

महोदया,

वरील संदर्भीय विषयान्वये आपणांस सविनय सादर करण्यात येते की दिनांक:- ३१/०१/२०२२ रोजी संदर्भीय पत्रान्वये मा.महालेखाकार, मुंबई यांचेकडे लेखापरीक्षण विषयक बाबींचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर चर्चेमध्ये लेखा परीक्षणासाठी लागणारा कालावधी, लेखा परीक्षण संदर्भातील तज्ज्ञ लोकांचे पथक, त्या संदर्भातील ज्ञान आणि अनुभव याची सांगड घालून लेखा परीक्षाणाची गुणवत्ता कशी वाढवता येईल याबाबतचे विचारमंथन करण्यात आले.

त्याच अनुषंगाने नमूद करण्यात येते की, संचालक (लेखा व कोषागारे) हे लेखा विभागातील सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी आहेत. त्यांच्यामार्फत स्थानिक निधी लेखा विभागांतील वरिष्ठ लेखा परीक्षकांच्या सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गात पदोन्नत्या होतात. स्थानिक निधी लेखा विभागांत काम केलेल्या वरिष्ठ लेखा परीक्षक संवर्गाला लेखा परीक्षणाचा दीर्घ अनुभव आणि लेखापरीक्षण विषयक ज्ञान असते. त्यांच्या पदोन्नत्या स्थानिक निधी लेखा विभागांतर्गतच्या स्थानिक निधी लेखा/महानगरपालिका लेखापरीक्षण या विभागांत करण्याबाबतचा प्राधान्याने केल्यावर लेखा परीक्षणाचे काम विहित वेळेत पूर्ण करणे ही शक्य होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा लेखापरीक्षणाच्या संख्यात्मक व गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी ही होईल.

मागील काही वर्षात असे निदर्शनास येते की, स्थानिक निधी लेखा कार्यालयातून वरिष्ठ लेखा परीक्षक संवर्गातून सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण मोठे आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती नाकारण्यामुळे, त्यांच्या संवर्गात कुंठितता निर्माण होते, त्यामुळे कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गातून वरिष्ठ लेखापरीक्षक संवर्गात पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदे उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी होते. त्याचा लेखापरीक्षण कामकाजावर परिणाम होऊ शकतो. तसेच इतर संवर्गातून सहाय्यक

लेखा अधिकारी पदावर स्थानिक निधी लेखा विभागात पदोन्नत होऊन आलेल्या कर्मचाऱ्यांना लेखापरीक्षणाचा फारसा अनुभव नसतो. लेखापरीक्षणाची व्याप्ती समजून घेऊन संबंधित लेखा संहिता, अधिनियम, शासन निर्णय/परिपत्रके यांचा अभ्यास करुन प्रत्यक्ष लेखापरीक्षणाचे काम करण्यासाठी एक ठराविक कालावधी लागतो. या बाबींमुळे लेखापरीक्षण विहीत कालावधीत पूर्ण करणे, त्याचा दर्जा राखणे जिकीरीचे ठरते. मागील पाच वर्षापासून स्थानिक निधी लेखा विभागांतर्गत वरिष्ठ लेखा परीक्षक संवर्गातून सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांची विभागनिहाय माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | पदोन्नतीझालेल्या कर्मचाऱ्यांचीसंख्या | पदोन्नतीच्यापदावररुजू झालेल्याकर्मचाऱ्यांचीसंख्या | पदोन्नतीनाकारलेल्या कर्मचाऱ्यांचीसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण | १८ | ०८ | १० |
| २ | पुणे | ११ | ०७ | ०४ |
| ३ | औरंगाबाद | ०९ | ०६ | ०३ |
| ४ | अमरावती | १२ | ०८ | ०४ |
| ५ | नागपूर | १६ | ०९ | ०७ |
| ६ | नाशिक | ०६ | ०२ | ०४ |
|  | एकूण | ७२ | ४० | ३२ |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता ४५ % वरिष्ठ लेखा परीक्षक यांनी सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गात झालेली पदोन्नती नाकारल्याचे निदर्शनास येते. त्यात प्रामुख्याने पदोन्नतीने स्थानिक निधी लेखा विभागाव्यतिरिक्त इतर विभागांत पदोन्नतीने पदस्थापना झाल्याचे कारण असावे असे वाटते.

उपरोक्त नमूद पार्श्वभूमीचा विचार करता, स्थानिक निधी लेखा विभागातील वरिष्ठ लेखा परीक्षक संवर्गातून सहाय्यक लेखा अधिकारी पदांवर पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या स्थानिक निधी लेखा विभागांतर्गतच्या कार्यालयात पदस्थापना करण्याबाबतचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. त्याचबरोबर याच पार्श्वभूमीवर सहाय्यक संचालक, उपसंचालक व सहसंचालक संवर्गातील पदोन्नत्या /पदस्थापना करताना ही त्यांच्या लेखापरीक्षण विषयक कामांतील पूर्वानुभवाचा ही प्राधान्याने विचार व्हावा. सद्यस्थितीत स्थानिक निधी लेखा विभागांतर्गत लेखापरीक्षण करण्यात येणाऱ्या संस्थाची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.1**
**स्थानिक निधी लेखाकडून लेखापरीक्षण करण्यात येत असणाऱ्या संस्थांचा तपशील**

| अ.क्र | संस्था | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषदा | 5 | 5 | 5 | 8 | 5 | 6 | 34 |
| 2 | पंचायत समिती | 45 | 57 | 54 | 76 | 56 | 63 | 351 |
| 3 | नगरपालिका | 22 | 50 | 41 | 50 | 40 | 40 | 243 |
| 4 | नगरपंचायत | 22 | 19 | 17 | 25 | 16 | 33 | 132 |
| 5 | सशुल्क संकीर्ण संस्था | 22 | 14 | 5 | 11 | 4 | 6 | 62 |
| 6 | निशुल्क संकीर्ण संस्था | 25 | 20 | 19 | 17 | 34 | 47 | 162 |
| 7 | कृषी विद्यापीठ | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 4 |
| 8 | पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 9 | ग्रामपंचायत | 2991 | 5614 | 4984 | 6657 | 3929 | 3649 | 27824 |

**सहसंचालक (महानगरपालिका) कार्यालयाकडून लेखापरीक्षण करण्यात येत असणाऱ्या संस्थांचा तपशील**

| अ.क्र | संस्था | उपविभाग १ | उपविभाग २ | उपविभाग ३ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | महानगर पालिका | ०२ | १२ | १३ | २७ |
| २. | महानगरपालिका परिवहन उपक्रम | ०२ | ०४ | ०० | ०६ |
| ३. | महानगरपालिका शिक्षण मंडळ | ० | ०५ | ०३ | ०८ |

त्या सोबतच शासनाच्या ठराविक योजना, प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने अनेक संस्थाचे विशेष लेखापरीक्षणाचे काम ही स्थानिक निधी लेखा विभागाकडे सोपवले जाते. अशा वेळी लेखापरीक्षण विषयक कामकाज करणारा पुरेसा कर्मचारी /अधिकारी वर्ग कार्यरत असणे अत्यावश्यक आहे.

सद्यस्थितीत स्थानिक निधी लेखा विभागांत कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी वर्गाची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

**रिक्त पदांचा तपशील**

| पदनाम | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सहसंचालक | २ | ० | ० | ० | १ | ० | ३ |
| उपसंचालक | १ | ० | ० | १ | ० | ० | २ |
| सहाय्यक संचालक | १ | ० | ० | १ | १ | ० | ३ |
| लेखापरीक्षा अधिकारी | ६ | १ | १ | ९ | १ | १ | १९ |
| सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी | १३ | ० | ० | ९ | २ | २ | २६ |
| वरिष्ठ लेखापरीक्षक | ४ | ५ | ० | २ | २ | २ | १५ |
| कनिष्ठ लेखापरीक्षक | २३ | २५ | १२ | २६ | १७ | २८ | १३१ |

केंद्रशासनामार्फत १४/ १५ वित्त आयोगामार्फत वितरीत करण्यात येणारा निधी चे लेखापरीक्षण करण्याची व त्याचे अहवाल AOL (Audit Online) प्रणालीमार्फत निर्गमित करण्याची जबाबदारी केंद्र शासनामार्फत स्थानिक निधी लेखा विभागावर सोपविण्यात आलेली आहे. तसेच MAINS, MIS आणि L-CAP या संगणकीय प्रणाली ही स्थानिक निधी लेखा विभागाचे काम पारदर्शक पद्धतीने व जलद व्हावे यासाठी विकसित करण्यात आलेल्या आहेत. त्या प्रणालीवर स्थानिक निधी लेखा विभागाचे कामकाज ही यशस्वीपणे सुरु आहे. याबाबत अधिक तंत्रज्ञान प्रणाली User friendly पद्धतीने विकसित करावयास असतील लेखापरीक्षण कामकाजाचा अनुभव, त्या कामांतले सातत्य आणि ज्ञान असणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचा उपयोग होऊ शकतो.

**लेखा परीक्षणाची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | २०२०-२१ पर्यंत पूर्ण |
| २ | पंचायत समिती | २०२०-२१ प्रगतीत |
| ३ | ग्राम पंचायत | २०२०-२१ प्रगतीत |
| ४ | नगरपालिका/नगरपंचायत | २०१९-२० पर्यंत पूर्ण |
| ५ | महानगरपालिका | २०१७-१८ पासून २०२१ पर्यंत प्रलंबीत व काही महानगरपालिका २०१६-१७, २०१७-१८ प्रगतीत |
| ६ | संकीर्ण | कृषी विद्यापीठ/पशु व इतर संस्था (२०१८-१९ पर्यंत पूर्ण तर काही प्रगतीवर) |

मा.महालेखाकार कार्यालयाकडे अकाऊंट व ऑडीट शाखा स्वतंत्र आहेत. या धर्तीवर लेखापरीक्षणाच्या बाबतीत स्थानिक निधी लेखा विभाग हा ही स्वतंत्र असणे गरजेचे आहे. मा.महालेखाकार यांचे स्थानिक निधी लेखा विभागावर तांत्रिक नियंत्रण आहे. संदर्भीय बैठकीमध्ये या अनुषंगाने सविस्तर चर्चा ही झालेली आहे. ही बाब विचारात घेता उपरोक्त प्रस्तावाचा विचार व्हावा असे वाटते.

उपरोक्त नमूद बाबींचे विचार करता, आपणांस विनंती करण्यात येते की, वरिष्ठ लेखापरीक्षक (स्थानिक निधी लेखा) संवर्गातून सहाय्यक लेखा अधिकारी संवर्ग पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्थानिक निधी लेखा/महानगरपालिका लेखापरीक्षण विभागांत पदस्थापना देण्याबाबतचा आपल्या स्तरावरुन संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना निर्देश द्यावेत. तसेच सहाय्यक संचालक /उपसंचालक /सहसंचालक यांच्या पदस्थापना / पदोन्नत्या करतानाही स्थानिक निधी लेखा विभागातील अनुभव विचारांत घ्यावा ही विनंती.

१५/०३/२०२२

**( माधव नागरगोजे)**
संचालक
संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

प्रत:- संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.